## MAHARASHTRA ACT No. VIII OF 1978.

## THE LEADERS OF OPPOSITION IN MAHARASHTRA LEGISLATURE SALARIES AND ALLOWANCES ACT, 1978.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक ११ एप्रिल १९७८ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

एम. ए. घोत्रे,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. VIII OF 1978.

## AN ACT TO PROVIDE FOR SALARIES AND ALLOWANCES OF LEADERS OF OPPOSITION IN MAHARASHTRA STATE LEGISLATUR

[राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक १३ एप्रिल १९७८ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला]

### सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८.

### महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्ष नेत्यांची वेतने व भत्ते यांसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्ष नेत्यांची वेतने आणि भत्ते ठरवून देण्यासाठी आणि यात यापुढे दिलेल्या इतर बाबींसाठी तरतूद करणे इष्ट आहे; त्याअर्थी आता, भारतीय गणराज्याच्या एकोणतिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमाला, महाराष्ट्र विधानमंडळातील विरोधी पक्ष नेत्यांची वेतने व भत्ते अधिनियम, १९७८ असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो २७ मार्च १९७८ पासून अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

२. या अधिनियमात, राज्य विधानमंडळाच्या कोणत्याही सभागृहाच्या संबंधात " विरोधी पक्ष नेता " म्हणजे सर्वात जास्त सदस्यसंख्या असणाऱ्या, त्यावेळी राज्य शासनाच्या विरोधी असलेल्या पक्षाचा नेता असलेला, आणि विधानसभेचा अध्यक्ष किंवा यथास्थिती विधानपरिषदेचा सभापती यांनी तशी मान्यता दिलेला राज्य विधानसभेचा किंवा यथास्थिती राज्य विधानपरिषदेचा सदस्य. व्याख्या.

**स्पष्टीकरण.**—जेव्हा समान सदस्य संख्या असणारे विधानसभेतील किंवा विधानपरिषदेतील राज्य शासनाच्या विरोधात असलेले दोन किंवा अधिक पक्ष असतील तेव्हा, विधानसभेचा अध्यक्ष किंवा यथास्थिती विधानपरिषदेचा सभापती, हा, पक्षांचे स्थान लक्षात घेऊन या अधिनियमाच्या प्रयोजना-करिता अशा पक्षांच्या नेत्यांपैकी कोणत्याही एकाला विरोधी पक्ष नेता म्हणून मान्यता देईल आणि अशी मान्यता ही अंतिम व निर्णायक असेल.

विरोधी पक्ष नेत्यांचे वेतन.

३. प्रत्येक विरोधी पक्ष नेत्याला दरमहा रु. १,४०० इतके वेतन देण्यात येईल.

विरोधी पक्ष नेत्यांची निवास व्यवस्था.

४. (१) प्रत्येक विरोधी पक्ष नेता हा, तो जोपर्यंत नेता असल्याचे चालू राहील तोपर्यंत आणि त्यानंतर पंधरा दिवसांच्या कालावधीकरिता, मुंबईतील सुसज्ज निवासस्थानाचा भाडे न देता वापर करण्यास किंवा अशा निवासस्थानाऐवजी दरमहा रु. २५० या दराने घरभाडे भत्ता मिळण्यास पात्र असेल.

(२) या कलमाद्वारे तरतूद केलेल्या कोणत्याही निवासस्थानाच्या व्यवस्थापनासाठी विरोधी पक्ष नेत्याला व्यक्तिशः कोणताही आकार पडणार नाही.

(३) या कलमाद्वारे तरतूद केलेली निवासी जागा सुसज्ज करण्यासाठी होणारा खर्च हा, राज्य शासन नियमांद्वारे, किंवा आदेशाद्वारे ठरवील अशा प्रमाणात असेल.

विरोधी पक्ष नेत्यांसाठी वाहने.

५. (१) राज्य शासन वेळोवेळी, प्रत्येक विरोधी पक्ष नेत्याच्या वापरासाठी मोटार गाडी आणि इतर योग्य प्रकारची वाहने, त्यांचे परिरक्षण व दुरुस्तीसंबंधी, या बाबतीत करण्यात आलेले नियम किंवा आदेश यांद्वारे ठरविण्यात येतील अशा अटींवर खरेदी करील व पुरवील त्याचप्रमाणे राज्य शासन पुरवण्यात आलेल्या मोटारगाडीसाठी किंवा वाहनासाठी शोफरची सेवा निःशुल्क पुरवील.

(२) प्रत्येक विरोधी पक्ष नेत्याला दरमहा रु. ४०० या दराने वाहन भत्ता देण्यात येईल.

प्रवास भत्ता व दैनिक भत्ते आणि मुख्यालया-व्यतिरिक्त इतर ठिकाणी निवास व्यवस्था.

६. राज्य शासनाने यासंबंधात केलेले कोणतेही नियम किंवा आदेश यांस अधीन राहून प्रत्येक विरोधी पक्ष नेत्यास पुढील गोष्टी मिळण्याचा हक्क असेल :—

(अ) (एक) पद ग्रहण करण्यासाठी, मुंबईबाहेरील त्याच्या नेहमीच्या निवासस्थानापासून मुंबईपर्यंतच्या प्रवासाच्या संबंधात; आणि

(दोन) पदाचा त्याग केल्यानंतर मुंबईपासून मुंबईबाहेरील त्याच्या नेहमीच्या निवासस्थाना-पर्यंतच्या प्रवासाच्या संबंधात ;

त्याला स्वतःसाठी आणि त्याच्या कुटुंबातील व्यक्तींसाठी आणि त्याच्या व त्याच्या कुटुंबाच्या चीजवस्तूंच्या परिवहनासाठी प्रवास भत्ता ; आणि

(ब) विरोधी पक्ष नेता म्हणून त्याची कर्तव्ये पार पाडताना त्याने केलेल्या दौऱ्यांच्या संबंधात प्रवास भत्ता व दैनिक भत्ता आणि अशा दौऱ्यांवर असताना त्याने भेट दिलेल्या ठिकाणी योग्य अशी निवास व्यवस्था.

**स्पष्टीकरण.**—"मुंबई" या शब्दप्रयोगामध्ये राज्य शासनाने या कलमाच्या प्रयोजनांसाठी ठरविलेल्या अन्य कोणत्याही ठिकाणाचा समावेश होतो.

रेल्वेने आणि आगबोटीने निःशुल्क प्रवास.

७. प्रत्येक विरोधी पक्ष नेत्याला, या बाबतीत नियमांद्वारे किंवा आदेशांद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रीतीने व अशा शर्तींना अधीन राहून, कोणत्याही वेळी भारताच्या कोणत्याही भागामध्ये कोणत्याही रेल्वेने किंवा महाराष्ट्राच्या कोणत्याही भागामध्ये आगबोटीने पहिल्या वर्गातून प्रवास करण्याचा हक्क त्याला ज्यामुळे प्राप्त होईल, अशा सुविधादेखील पुरविण्यात येतील :

परंतु असे की, महाराष्ट्र राज्याबाहेर, भारताच्या कोणत्याही भागातील असा रेल्वेचा प्रवास हा, विरोधी पक्ष नेत्याला एकट्याने किंवा त्याच्या/तिच्या पत्नी/पतीबरोबर करता येईल, तथापि, कोणत्याही वर्षी त्याने राज्याबाहेर केलेला किंवा त्याच्या/तिच्या पत्नीने/पतीने त्याच्या/तिच्या निवासस्थानापासून राज्यात केलेला प्रवास हा एकूण दहा हजार किलोमीटरपेक्षा जास्त असता कामा नये.

**स्पष्टीकरण.**—विरोधी पक्ष नेत्याने त्याच्या/तिच्या पत्नी/पतीबरोबर केलेल्या प्रवासाची किलोमीटरमध्ये गणना करण्याच्या प्रयोजनासाठी, त्याने राज्याबाहेर केलेल्या प्रवासाचे किलोमीटर आणि त्याच्या/तिच्या पत्नीने/पतीने त्याच्या/तिच्या निवासस्थानापासून राज्यात केलेल्या प्रवासाचे किलोमीटर हे स्वतंत्रपणे मोजण्यात येतील.

८. राज्य शासनाने केलेल्या कोणत्याही नियमांना किंवा दिलेल्या कोणत्याही आदेशांना अधीन राहून, विरोधी पक्ष नेता व त्याच्याबरोबर राहणाऱ्या त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती व त्याच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती, राज्य शासनाच्या व्यवस्थापनाखाली असणाऱ्या रुग्णालयात मोफत जागा मिळण्यासाठी आणि वैद्यकीय सहाय्य व उपचार मिळण्यासाठी पात्र असतील. वैद्यकीय सहाय्य.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनाकरिता, "कुटुंबातील व्यक्ती" या शब्दप्रयोगाचा अर्थ पती, पत्नी, मुलगा, मुलगी, आई, वडील, भाऊ किंवा बहीण.

९. (१) प्रत्येक विरोधी पक्ष नेत्यास त्याच्या पदावधीत त्याच्या निवासस्थानी किंवा त्याच्या मतदारसंघात त्याने निवडलेल्या व राज्य शासनाने या अधिनियमाखाली तरतूद केलेल्या निवासस्थानाव्यतिरिक्त असलेल्या कोणत्याही जागी, शासकीय खर्चाने दूरध्वनी बसवून घेण्याचा हक्क असेल. दूरध्वनीच्या सोयी.

(२) पोट-कलम (१) खाली बसवलेल्या दूरध्वनीबाबतचा तो बसवण्याचा, त्याच्या प्रारंभिक अनामत रकमेचा, त्याच्या परिरक्षणासाठी करावयाच्या भाडेखर्चाचा आणि त्यावरून केलेल्या अधिकृत बोलण्यांचा (Calls) कोणताही आकार विरोधी पक्षनेत्यावर पडणार नाही.

(३) या कलमाखाली दूरध्वनीची सोय ज्या महिन्यात करण्यात आली असेल त्या महिन्यापासून प्रत्येक विरोधी पक्ष नेत्यास दरमहा दोनशे रुपये एवढी रक्कम देण्यात येईल.

(४) ज्या बाबतीत विरोधी पक्ष नेत्याने पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही जागी त्याच्या स्वत:च्या खर्चाने दूरध्वनी बसवलेला असेल त्या बाबतीत अशा दूरध्वनीबाबतचा भाड्याचा खर्च राज्य शासन सोशील आणि अशा दूरध्वनीबाबत त्याला दरमहा रु. २०० एवढी रक्कम देण्यात येईल.

१०. प्रत्येक विरोधी पक्ष नेत्यास, त्या बाबतीत करण्यात येतील अशा नियमांद्वारे किंवा आदेशांद्वारे ठरवण्यात येईल असा कर्मचारीवर्ग देण्यात येईल. सचिव-विषयक सोयी.

११. राज्य विधानमंडळाच्या सदस्यांची वेतने व भत्ते ठरवणाऱ्या, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीत काहीही अंतर्भूत असले तरी, विरोधी पक्ष नेता हा विधानसभेचा किंवा यथास्थिती विधानपरिषदेचा सदस्य असूनही, त्याला अशा विधीअन्वये कोणतेही वेतन किंवा भत्ते किंवा इतर सोयी घेण्याचा हक्क असणार नाही. विरोधी पक्ष नेत्याने राज्य विधान मंडळ सदस्य म्हणून वेतन व भत्ते इ० न घेणे.

१२. शंकेचे निरसन करण्यासाठी याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की, एखादी व्यक्ती विरोधी पक्ष नेत्याचे पद धारण करत आहे केवळ याच गोष्टीमुळे ती व्यक्ती राज्य विधानसभेची किंवा राज्य विधानपरिषदेची सदस्य म्हणून निवडली जाण्यास किंवा असण्यास अपात्र ठरणार नाही. विरोधी पक्ष नेता अपात्र न ठरणे.

राज्य शासनाची नियम व आदेश करण्याची शक्ती.

१३. (१) या अधिनियमात इतरत्र समाविष्ट असलेल्या, नियम किंवा आदेश करण्याच्या शक्तीस बाध न येऊ देता, राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी कोणतेही नियम किंवा आदेश करता येतील.

(२) या अधिनियमाखालील कोणताही नियम किंवा आदेश हा, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेपेक्षा अगोदरची नसेल अशा कोणत्याही तारखेपासून पूर्वलक्षी प्रभावाने करता येईल.

(३) या अधिनियमाखाली केलेले कोणतेही नियम किंवा आदेश हे ते जणू या अधिनियमातच समाविष्ट केले असल्याप्रमाणे परिणामक्षम असतील.

सन १९५६ चा मुंबई अधिनियम ४९ याची सुधारणा.

१४. मुंबईचा विधानमंडळाच्या सदस्यांचे पगार व भत्ते अधिनियम, १९५६ यातील,— १९५६ चा मुंबई अधि-नियम ४९.

(अ) कलम ३-अ वगळण्यात येईल ;

(ब) कलम ५-अब मध्ये,—

(एक) "त्या कलमांच्या प्रयोजनार्थ कोणताही प्रवास करताना किंवा पार पाडताना विरोधी पक्ष नेता यास आणि" हे शब्द वगळण्यात येतील ;

(दोन) समास टीपेतील "विरोधी पक्ष नेता व" हे शब्द वगळण्यात येतील ;

(क) कलम ७ मध्ये,—

(एक) "अध्यक्ष किंवा सभापती" या शब्दांनंतर "किंवा विरोधी पक्ष नेता" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(दोन) "उप मंत्री, अध्यक्ष, सभापती" या शब्दांनंतर ", विरोधी पक्ष नेता" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(तीन) समास टीपेतील "उप मंत्री, अध्यक्ष, सभापती" या शब्दांनंतर ", विरोधी पक्ष नेता" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद)

य. शं. कानिटकर,
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.